# ॲन्टी करप्शन ब्युरोची नागरिकांकरीता सनद

| अ. क्र. | विभागाकडुन पुरविल्या जाणाऱ्या सेवा | आवश्यक कागदपत्रे पुर्ण झाल्यानंतरचे सेवा पुरविलेबाबतचे वेळापत्रक | प्रथम अपील | द्वितीय अपील |
|---|---|---|---|---|
| १ | सापळा प्रकरणे | भ्रष्टाचाराबाबत तक्रार आल्यास त्याची पडताळणी करून यशस्वी सापळा झाल्यावर प्रथम खबरी अहवाल दाखल केला जातो. प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्यानंतर सदरबाबत तपास पूर्ण झाल्यानंतर ज्या प्रकरणात शासनाची अथवा सक्षम प्राधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक आहे अशा प्रकरणात सदरची परवानगी प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येते.<br>ज्यावेळेस सापळा यशस्वी होत नाही अशी खात्री पटल्यानंतर सदरच्या प्रकरणामध्ये मागणी चा प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात येतो. सदर खटल्याच्या तपास पूर्ण झाल्यानंतर सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी घेवून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येते. | संबधीत परिक्षेत्राचे अपर पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक | संबधीत विभागाचे अपर महासंचालक (पूर्व) / अपर महासंचालक (पश्चिम) |
| २ | सापळा प्रकरणा व्यतिरिक्त इतर प्रकरणे | १. सापळा प्रकरणाव्यतिरिक्त भ्रष्टाचाराच्या इतर प्रकरणाच्या बाबतीत तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्राथमिक चौकशी करणे आवश्यक आहे. सदरची चौकशी पूर्ण झाल्यांनतर प्राथमिक तपासात तथ्य आढळल्यास वर्ग १ च्या लोकसेवकाचे प्रकरण शासनाकडे उघड चौकशीच्या परवानगीसाठी पाठविले जाते.<br>२. उघड चौकशीसाठी शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर चौकशीत गुन्हा दाखल करणेचे निष्पन्न झाल्यास तातडीने प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात येतो.<br>३. ज्या प्रकरणात शासनाची मान्यता आवश्यक नाही अशा उघड चौकशी पुर्ण झाल्यावर गुन्हा दाखल करणे आवश्यक असल्यास प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात येतो. | संबधीत परिक्षेत्राचे अपर पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक | संबधीत विभागाचे अपर महासंचालक (पूर्व) / अपर महासंचालक (पश्चिम) |